# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक 10.5.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक** 82 - "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकासासाठी विशेष तरतूद" योजने अंतर्गत" निधी वितरीत करण्याबाबत." सन २०२२-२३ साठी लेखाशिर्ष (४२१७ ०५४१) खाली रक्कम रु. ०.८५ कोटी

**संदर्भ-**०१. शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(१७८(२))/न.वि.-१६;दि. २७ मार्च, २०२३

०२. अमरावती महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ७६; दि. ३१.०३.२०२३

०३. महानगरपालिकेचे पत्र क्र. अमनपा/बा.वि./का.अ.१/७६/२०२३; दि. २७.०४.२०२३

०४. शासन शुध्दीपत्रक निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र.२३६ (१७८(२)) /न.वि.-१६; दिनांक ०८ मे, २०२३

**विषय क्रमांक** 82 - संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद" या शिर्षा अंतर्गत रु. ०.८५ कोटी मंजूर झाले आहे. सदर संदर्भीय पत्र क्र. १ सर्वसाधारण सभेच्या माहे मार्च, २०२३ रोजी प्रशासकीय विषय अवलोकनार्थ ठेवण्यात आला. त्याअनुषंगाने ठराव क्र. ७६ अन्वये प्रशासकीय विषयाचे अवलोकन करण्यात आले. वरील कामांची अंदाजपत्रके तयार करण्याकरीता जागेची पाहणी करण्यात आली. शासनास वस्तुस्थिती व कामाच्या नावामध्ये बदल करुन देण्याबाबत संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये महानगरपालिके तर्फे विनंती पत्र देण्यात आले होते. त्यानुसार संदर्भीय पत्र क्र. ४ प्राप्त झाले. त्यामध्ये संदर्भीय पत्र क्र. १ येथील शासन निर्णयातील अ.क्र. १, २ व ४ (रक्कम रु. ७५ लक्ष) या कामांस कार्यारंभ आदेश दिले नसल्यास सदर कामे रद्द करुन त्याऐवजी विवरण पत्रातील कामांना मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या अगोदर संदर्भीय पत्र क्र. १ मधील कुठल्याही कामांस कार्यारंभ आदेश दिलेला नाही.त्यामुळे संदर्भीय पत्र क्र. १ मधील काम क्र. ३ व संदर्भीय पत्र क्र. ४ मधील सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील २ कामे असे एकंदर ३ कामांना शासनाकडुन मंजूरी प्राप्त झाली आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १ | अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा नवी वस्ती ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळया पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २०.०० |
| २ | अमरावती महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १९ गणेश विहार नंबर दोन (न्यु कृष्णाअर्पण कॉलनी जवळ) खुल्या मैदानात बॅडमिंटन हॉल बांधणे जि. अमरावती | ५५.०० |
| ३ | अमरावती महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. २ तपोवन मधील माधवी विहार मध्ये बगीचा विकसीत करणे. जि. अमरावती | १०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **८५.००** |

वरील प्रमाणे या कामासाठी रक्कम रु. ०.८५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. शासन निर्णयामध्ये प्रकल्प खर्चाचा १०० टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहणार असे नमुद केले आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करिता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती